## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

'वहिनींच्या बांगडया' या चित्राच्या उत्तुंग यशाने उत्साहित होऊन य.गो.जोशी यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' या कथेवर एक अकृत्रिम कौटुंबिक चित्रपट तयार केला. या चित्राला फ्रान्समधील कॅन्स (Cannes Film Festival) या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (Critic Award) बक्षीस मिळाले. या चित्रपटाचा दिल्लीतील प्रीमियर भारताचे त्या वेळचे राष्ट्राध्यक्ष सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत झाला होता.

वडिलांच्या मृत्युनंतर एकमेकांकडे पाठ फिरवलेल्या भावांना आपल्या प्रेमाने पुन्हा एकत्र आणून विस्कटलेले घर सावरणाऱ्या बहिणीची ही कथा. बेबी नंदा या हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणाऱ्या अभिनेत्रीचा हा तिच्या या क्षेत्रातील पदार्पणातील पहिल्या काही चित्रांपैकी यशस्वी ठरलेला चित्रपट. तिच्याबरोबर मास्टर छोटू, चित्तरंजन कोल्हटकर, चंद्रकांत गोखले आणि विक्रम गोखले हे पिता पुत्र, सुमती गुप्ते असे दर्जेदार कलावंत होते. वडिलांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीच्या समारंभात शास्त्रीय संगीताची मैफल दाखवली आहे, त्यासाठी सुप्रसिद्ध गायक वसंतराव देशपांडे यांना पाचारण केले होते आणि त्यांच्यावर त्यांनीच गायलेले गाणे चित्रित करण्यात आले होते.

आज प्रचलित असलेली 'स्टोरी बोर्ड' ही संकल्पना आठवले यांनी १९५४ साली या चित्रासाठी वापरली होती. 'वहिनींच्या बांगडया'चे वेळी ते चित्रीकरणाचा आराखडा करीतच होते. या वेळी त्यांनी दीक्षित नावाच्या एका चित्रकाराच्या मदतीने कॅमेऱ्यातून दिसणारा प्रत्येक शॉट चित्रबद्ध केला आणि त्या आराखड्यात अंतर्भूत केला. पुण्याच्या फिल्म अर्काइव्हजमध्ये याचे नमुने जतन केलेले आहेत.

## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

### सुख देवासी मागावे

सुख देवासी मागावे
दु:ख देवाला सांगावे
सुख देवासी मागावे.

देव मागे देव पुढे
देव आहे चोहिकडे
डोळे मिटुनी बघावे
सुख देवासी मागावे.

धाव घ्यावी देवापाशी
जशी माउलीच्या कुशी
तान्हीयाने प्रेम घ्यावे
सुख देवासी मागावे.

देव प्रेमळ प्रेमळ
देव आरसा निर्मळ
बिंब तयात पहावे
सुख देवासी मागावे.

## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

### इच्छा देवाची देवाची

इच्छा देवाची देवाची
इच्छा देवाची.

तोच वाहतो सदैव चिंता
अनंत या विश्वाची
इच्छा देवाची.

दयासिंधु तुज म्हणती देवा
दु:खाचा का जग मग वणवा
का रे ताटातूट अशी ही
बहिणीची भावांची?
इच्छा देवाची.

प्राजक्ताची फुले उमलती
तशा भावना हृदयी फुलती
कोमलतेवर क्रूर पाऊले
नाचती दुर्दैवाची
इच्छा देवाची.

प्रेमासाठी माणुस जगतो
प्रेमासाठी झुरतो मरतो
जग ही वस्ती प्रेमासाठी
जगणाऱ्या ज्योतींची
इच्छा देवाची.

## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

### सोनुल्या गुपित सांगते तुला

सोनुल्या गुपित सांगते तुला
तुला पाहता आयुष्याचा
अर्थ मला समजला
गुपित सांगते तुला.

जणु बिलोरी हसरी कमळे
तुझे टपोरे सुंदर डोळे
आभाळाच्या पलिकडचेही
त्यातून दिसते मला
गुपित सांगते तुला.

तुझे गुलामा घेता चुंबन
होते मजवर अमृत सिंचन
या सौख्याचा हेवा करुनी
चंद्र झुरू लागला
गुपित सांगते तुला.

अज्ञातातून उदया आला
घरात माझ्या किरण कोवळा
झुळझुळत्या या आनंदाहून देव काय वेगळा?
गुपित सांगते तुला.

## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

### बाई मी कशी ग बाई मी कशी

बाई मी कशी ग बाई मी कशी
ग बाई मी कशी ग.

हातात बांगडया कपाळी कुंकू
नवरात्रातली लक्ष्मी जशी, लक्ष्मी जशी ग.

सासू कशी?
सासू कशी ग सासू कशी?
सारखी कावते, हळूच चावते
अंथरुणातली पिसू जशी, पिसू जशी ग.

जाऊ कशी?
जाऊ कशी ग जाऊ कशी?
गोरी गोरी पान, तिखट कान
दुधापासली माऊ जशी, माऊ जशी.

सासरा कसा?
सासरा कसा ग सासरा कसा?
लाखात विरळ, साधा नि सरळ
खुंटीवरचा कासरा जसा, कासरा जसा ग.

दीर कसे?
माझे दीर कसे ग माझे दीर कसे?
नथीतून तीर मारतात वीर
केरसुणीतले हीर जसे, हीर जसे ग.

वन्स कशी?
वन्स कशी ग वन्स कशी?
ठेंगणी न ठुसकी नाकात बसकी
जाफराबादची राणी जशी, जाफराबादची राणी जशी,
राणी जशी ग.

आणि ते?
ते कसे ग ते कसे?
नवसाला पावती, भक्तीला भुलती
देव्हाऱ्यातील देव जसे, देव्हाऱ्यातील देव जसे, देव
जसे ग.

## चित्रपट - शेवग्याच्या शेंगा

### धरणी मुकली मृगाच्या पावसाला (ओव्या)

धरणी मुकली मृगाच्या पावसाला
सुख माझे हरपले, कुठे शोधू गं भावाला?
अनंत गगनी तारका अगणित
तसे आठवू भावांचे गुण किती असंख्यात.

चंद्राचे प्रतिबिंब, गंगेच्या प्रवाहात, गंगेच्या प्रवाहात
भावाची रम्य मूर्ती उभी माझ्या मानसात.

देवाच्या देवळात गोड सनई वाजते,
गोड सनई वाजते
भाऊरायाची प्रेमळ हाक अंगणात येते.

वार्याची झुळूक आणी सुगंध फुलांचा
आणी सुगंध फुलांचा
सांग जिवाच्या मैत्रिणी, गोड निरोप भावाचा,
गोड निरोप भावाचा.